<u>विशेष दिवाणी दावा क्र. १४८/२०२१</u>

निशाणी २८ लगत

**<u>(सदर साक्ष न्यायालयाच्या टी.व्ही वर प्रक्षेपित करण्यात आली.)</u>**

**<u>प्रतिवादी क्र. ३ तर्फे विधिज्ञ वकिल श्री. एस.के. राणे यांचेमार्फत वादी यांचा उलटतपास शपथेवर सुरू....)</u>**

सदरचा दावा माझ्या आजीने दाखल केला होता.

**प्रश्नः-** तुमची आजी हिंडते, फिरते, ऐकू येते व व्यवस्थीत बोलते बरोबर का?

**उत्तरः-** तिला चालायला काठी लागते, तिला कमी ऐकू येते, माझ्या आजीचे ८४ पेक्षा जास्त वय आहे.

माझ्या आजीची वर नमूद परिस्थिती सांगितली आहे त्याबाबत मी वैदयकीय प्रमाणपत्र दाखल केले नाही तसेच माझ्या अखत्यारपत्रात सदर मजकूर नमूद नाही. हे म्हणणे खरे नाही की, माझी आजी तंदुरूस्त असून ती कोर्टात येवू शकते. हे म्हणणे खरे नाही की, दावा मिळकतीची माहिती माझ्या आजीला माहिती असून त्याची माहिती मला नाही. दावा मिळकतीमध्ये माझ्या आजीचा हिस्सा असल्याबाबत प्रथमत: सन २०२१ साली मला समजले. दावा मिळकती माझ्या आईच्या वडीलांच्या होत्या ही बाब माझ्या वडीलांना माहिती होती. सन २०२१ पूर्वीदेखील आम्हांला माहित होते की, या मिळकती माझ्या आईच्या वडीलांच्या होत्या व आजीचा हिस्सा होता. माझ्या आजीचे वडील सन १९५५ साली मयत झाले असावे. माझे आजीचे वडील जेव्हा वारले त्यापूर्वी आजीचे विवाह होवून ती सासरी नांदत होती. हे म्हणणे खरे आहे की, माझ्या आजीचे वडील सन १९५६ पूर्वीच मयत झाले. १९५६ साली माझा जन्म झाला नव्हता. माझा जन्म १९८८ सालचा आहे. माझे शिक्षण बारावीपर्यंत झाले आहे. त्यानंतर मी नोकरी केली. सध्या मी व्यवसाय करतो.

सदरचा दावा दावा मिळकतीमध्ये हक्क मिळण्यासाठी दाखल करण्यात आलेला आहे. पुराव्याचे प्रतिज्ञापत्र देतेवेळी मी दावा वाचला होता. पुराव्याचे प्रतिज्ञापत्र माझ्या वकीलांनी तयार केले असून त्यावर मी वाचून सही केली आहे. पुराव्याच्या प्रतिज्ञापत्रातील मजकूर मी सांगितल्याप्रमाणे वकीलांनी तयार केला. हे म्हणणे खरे नाही की, दाव्यामध्ये आरटीएस अपील क्र. ८८/२०२२ व १९२/२०२२ याचा कुठेही उल्लेख केलेला नाही. आता मला दावा दाखविण्यात आला त्यावर आरटीएस अपील क्र. ८८/२०२२ व १९२/२०२२ याचा कुठेही उल्लेख केलेला नाही.

**प्रश्नः-** प्रांताकडील अपीलामध्ये लोणीवळी फेरफार क्र. ७१२ आव्हानित केलेली

नव्हती

**उत्तर:-** त्या अपीलामध्ये प्रिंटीग चुक झाली होती. ७१२ च्या जागी ११७ झाली होती.

सदरचे चुक दुरूस्त करण्यासाठी अर्ज करण्यात आलेला नव्हता. सदरचे अपील माझ्या आजीचे वडील मयत झाल्यानंतर त्यांच्या वारसांची नोंद करण्यासाठी केलेली होती. फेरफार क्र. ७१२ हे १९५६ साली नोंद करण्यात आले होते. फेरफार क्र. ७१२ याच्यावर काशिनाथ व लक्ष्मण यांच्या नावाची नोंद झाली होती. पाच ते सहा जमीन मिळकतींना काशिनाथ व लक्ष्मण यांची नावे लागली होती. सहा सर्व्हे नंबरपैकी पाच सर्व्हे नंबरची विक्री झालेली आहे. त्यामध्ये ३/३ हा सर्व्हे नंबर बाकी आहे. सदर जमीन मिळकती दि. ०५/०२/२००८ रोजी काशिनाथ व लक्ष्मण यांनी प्रतिवादी क्र. ३ यांना विकली होती. दि. ०५/०२/२००८ रोजीच्या खरेदीखतानुसार दावा मिळकतींना प्रतिवादी क्र. ३ यांच्या नावाची नोंद सन २००८ साली झालेली होती.

माझ्या आजीचे वडील मयत झाल्यानंतर माझ्या आजीने काशिनाथ व लक्ष्मण यांच्या विरोधात कधीही मुदतीत दावा, अर्ज, अपील सन १९५६ नंतर केलेला नाही. तसेच सन २००८ नंतर जमीन मिळकती विक्री झाल्यानंतर देखील मुदतीत दावा, अर्ज, अपील दाखल केलेले नाही. जेव्हा प्रथम अपील दाखल करण्यात आले तेव्हा एस.डी.ओ कडून ते फेटाळण्यात आले. त्यानंतर कलेक्टर कडे जे अपील दाखल केले होते ते देखील फेटाळण्यात आले. दोन्ही अपील विलंबाच्या मुद्दयावर फेटाळण्यात आले. विलंबाचा मुद्दा घेवून आम्ही अप्पर आयुक्त कोकण विभाग यांच्याकडे गेलो होतो. कोकण आयुक्त यांनी आमचे रिव्हीजन मंजूर केले. त्या विभागामध्ये प्रतिवादी क्र. ३ यांनी महसूल मंत्री यांच्याकडे अर्ज दाखल केला त्यामध्ये रिव्हीजन अर्ज मंजूर करून वादी व प्रतिवादी क्र. १ व २ यांची लागलेली नावे कमी करण्यात आली. त्या विरोधात आम्ही उच्च न्यायालय मुंबई येथे रिट दाखल केलेली होती. त्यामध्ये फेरफार नोंदीस स्थगीती दिलेली होती परंतु, स्थगीती आदेश येण्यापूर्वीच प्रतिवादी क्र. ३ यांची नोंद ७/१२ सदरी करण्यात आलेली होती.

सन २००८ पासून दावा मिळकती या प्रतिवादी क्र. ३ यांच्या प्रत्यक्ष ताबेकब्जात आहेत. हे म्हणणे खरे नाही की, आमच्या आजीचे काशिनाथ व लक्ष्मण यांच्याकडे येणे जाणे होते. हे म्हणणे खरे आहे की, काशिनाथ व लक्ष्मण हे माझ्या आजीचे सावत्र भाउ होते. हे म्हणणे खरे आहे की, आजीच्या वडीलांनी दुसरे लग्न केल्यामुळे आमच्या आजीचे तिथे जाणे येणे नव्हते. माझी आजी तिचे वडील मयत

झाल्यानंतर तिच्या माहेरी गेली नाही. सन १९८० मध्ये माझे वडील व काका सज्ञान होते. माझे वडील व काका सज्ञान झाल्यानंतर त्यांनी दावा मिळकतीची कुठलीही कागदपत्र काढली नाही. लोणीवळी फेरफार क्र. २१४३ ही सिताराम काळू आरिवले यांच्या नावाने दाखल केली आहे. चुलत आजोबांच्या मिळकतीला नाव लावणेकरीता सन २०११ सालापासून आम्ही प्रयत्न करत आहोत. साक्षीदार स्वत:हून सांगतो की, त्याच्या चुलत भावाने ते गेले असून आम्ही केलेले नाहीत. सीताराम काळू आरिवले यांच्या मिळकतीला नाव लागल्याचे माझ्या आजीला आधीच माहिती होते. हे म्हणणे खरे नाही की, सन २०११ मध्ये मी सज्ञान असल्यामुळे त्याबाबत मला ही माहिती होती. हे म्हणणे खरे नाही की, सीताराम यांचे मिळकतीला नाव लागलेले होते त्यावेळेस बंडू बेंदू आरिवले याच्या मिळकतीला नाव लागलेले आहे याची सुध्दा माहिती होती. हे मला सांगता येणार नाही की, मिळकत खरेदी करण्यापूर्वी पेपर नोटीस देण्यात आली होती. त्यावेळेस काशिनाथ व लक्ष्मण यांना जो काही मोबदला देण्यात आला होता तो सन २००८ साली देण्यात आला होता किंवा कसे हे मला सांगता येणार नाही.

**उलटतपास पुढील तारखेपर्यंत तहकूब.**

श्रवणोत्तर स्वीकृती

UMA YASH BORADE KAPOOR
Digitally signed by UMA YASH BORADE KAPOOR
Date: 2026.03.13 11:45:42 +0530

दि. १०/०३/२०२६

**(उमा वाय. बोराडे -कपूर)**

४ थे सहदिवाणी न्यायाधीश व स्तर, पनवेल